

# । श्रीशिवपञ्चाक्षरस्तोत्रम् ।

श्रीमद् आदि शंकराचार्यांनी भगवान शंकराच्या ‘नमः शिवाय’ या पाच अक्षरांच्या मंत्रावर आधारित, प्रत्येक अक्षरासाठी एक असे हे पाच श्लोकांचे स्तोत्र रचले आहे. सहसा या मंत्राबरोबर ॐ हा प्रणव जोडून म्हणण्याची रीत असली तरी मूळ मंत्र ‘नमः शिवाय’ असा पाच अक्षरांचाच आहे. ॐ कार जर मोजला तर हा मंत्र षडक्षर होईल.

ही अक्षरे : न- पृथ्वी तत्त्व, म- जल तत्त्व, शि- अग्नि तत्त्व, वा- वायु तत्त्व आणि य- आकाश तत्व यांचे प्रतिनिधित्व करतात असे अभ्यासकांचे मानणे आहे.

ही रचना इन्द्रवज्रा (गण- त त ज ग ग) व उपेन्द्रवज्रा (गण- ज त ज ग ग) वृत्तात केली आहे. सहावा फलश्रुतीचा श्लोक अनुष्टुप् छंदात आहे.

नागेन्द्रहाराय त्रिलोचनाय
भस्माङ्गरागाय महेश्वराय ।
नित्याय शुद्धाय दिगम्बराय
तस्मै 'न'काराय नमः शिवाय ॥ १

मराठी- ज्याच्या गळ्यात श्रेष्ठ सर्पाची माला आहे, ज्याला तीन डोळे आहेत, राख हेच ज्याचे सौंदर्य प्रसाधन आहे, जो देवांमध्ये श्रेष्ठ आहे, सार्वकालिक आहे, शुद्ध आहे, दिशा हेच ज्याचे वस्त्र आहे, अशा 'न' कार रूपी शंकराला नमस्कार.

डोळे जया तीन नि साप माला
रक्षा उटी वेष दिशाच ज्याला ।
देवात थोर, नित वास, पवित्र त्याते
वंदू ‘ न ’ रूपा शिवशंकराते ॥ १

मन्दाकिनीसलिलचन्दनचर्चिताय
नन्दीश्वरप्रमथनाथमहेश्वराय ।
मन्दारपुष्यबहुपुष्यमुपूजिताय
तस्मै 'म'काराय नमः शिवाय ॥ २

मराठी- ज्याने गंगाजल आणि चंदन यांचा लेप शरीरी लावला आहे, जो नंदीचा स्वामी आहे, प्रमथ गणांचा प्रमुख आहे, देवांमध्ये श्रेष्ठ आहे, रुई आणि इतर खूपशा फुलांनी ज्याची सुंदर पूजा बांधली आहे, अशा ‘ म ’ कार रूपी शंकराला नमस्कार असो.

भागीरथी जल नि चंदन लेप अंगी
ईशान, मुख्य प्रमथां, नि शागिर्द श्रृंगी ।
रुई नि सुंदर फुले बहु, पूजनाला
वंदू ‘ म ’ रूपा शिवशंकराला ॥ २

शिवाय गौरीवदनाब्जवृन्द_
सूर्याय दक्षाध्वरनाशकाय ।
श्रीनीलकण्ठाय वृषध्वजाय
तस्मै ‘ शि ’काराय नमः शिवाय ॥ ३

मराठी- जो स्वतः पवित्र आहे, पार्वतीच्या मुखकमलासाठी सूर्य आहे (ज्याच्या दर्शनाने पार्वतीचे मुखकमल फुलते), ज्याने दक्षाच्या धार्मिक कृत्यांचा (यज्ञाचा) नाश केला, ज्याचा गळा निळा आहे, ज्याच्या निशाणावर नंदी आहे, अशा त्या ‘ शि ’ कार रूपातील शंकराला नमस्कार असो.

मुखांबुजा भानु उमेस झाला
प्रजापती याग विनाश केला ।
गळा निळा, स्थान निशाण बैला
' शि ' कार रूपी नमू शिवाला ॥ ३

वशिष्ठकुम्भोद्भवगौतमार्य_
मुनीन्द्रदेवार्चितशेखराय ।
चन्द्रार्कवैश्वानरलोचनाय
तस्मै व_काराय नमः शिवाय ॥ ४

मराठी- वसिष्ठ, कुंभात जन्मलेले अगस्त्य, गौतम अशा महान ऋषींनी तसेच देवांनी ज्याची पूजा बांधली आहे, जो सर्वश्रेष्ठ आहे, चंद्र, सूर्य आणि अग्नी हे ज्याचे नेत्र आहेत, त्या ‘ व ’ कार रूपी शंकराला नमस्कार असो.

अगस्त्य गौतम वसिष्ठ आदी
महा मुनी, देव पदास वंदी ।
रवी शशी वन्हि त्रिनेत्र ज्याते
‘ व ’ कार रूपी नमू हराते ॥ ४

**यज्ञस्वरूपाय (यक्षस्वरूपाय) जटाधराय**

**पिनाकहस्ताय सनातनाय ।**

**दिव्याय देवाय दिगम्बराय**

**तस्मै य_काराय नमः शिवाय ॥ ५**

**मराठी- ज्याने यज्ञरूप (यक्षरूप) धारण केले आहे, ज्याच्या हातात पिनाक धनुष्य आहे, जो प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे, दिशा हेच ज्याचे वस्त्र आहे, (तरीही) ज्याचे स्वरूप स्वर्गीय आहे, त्या ‘ य ’ कार रूपी शंकराला नमस्कार असो.**

**टीप- येथे ‘यज्ञस्वरूपाय’ च्या ऐवजी ‘यक्षस्वरूपाय’ असा पाठभेद आढळतो. तो घेतल्यास अर्थात किंचित बदल होईल.**

**जो यज्ञरूपी, दिशा हेच वस्त्र**

**माथा जटा, चाप करास शस्त्र ।       (चाप- धनुष्य)**

**स्वर्गीय रूपी, अभिजात स्वामी**

**‘ य ’ कार रूपी शिव वंदितो मी ॥ ५**

**टीप- पिनाक हे शंकराच्या धनुष्याचे नाव आहे.**

**पञ्चाक्षरमिदं पुण्यं यः पठेच्छिवसंनिधौ ।**

**शिवलोकमवाप्नोति शिवेन सह मोदते ॥६॥**

**मराठी- हे पाच अक्षराचे पावन स्तोत्र श्री शंकरासमोर बसून जो म्हणतो, तो शिवलोकास जातो आणि शंकराच्या सहवासात आनंदित होतो.**

**स्तोत्र हे पाच श्लोकांचे शिवाजवळि गातसे ।**

**पावुनी शिवलोकाते आनंद बहु होतसे ॥ ६**

****************

धनंजय बोरकर (९८३३०७७०९१)